**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**गणेशखिंड, पुणे ४११००७**

**परिपत्रक**

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**

**सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये,**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.**

**विषय: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० बाबत जनजागृतीसाठी‘कॅम्पस टूर’ उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत ...**

**महोदय/महोदया,**

**राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) - २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयांच्या परिसरात ‘कॅम्पस टूर’ या उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे.**

**या उपक्रमाचा उद्देश इयत्ता ९वी , १०वी व १२वी या वर्गात शिकणा-या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची वैशिष्ट्ये आणि फायदे समजावून सांगणे तसेच महाविद्यालयीन वातावरणाचा अनुभव घेण्याची संधी प्रदान करणे आहे.**

**या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना ‘कॅम्पस टूर’ दरम्यान माहितीपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्याची विनंती करण्यात येत आहे.**

**या कार्यक्रमाचा प्रस्तावित कालावधी दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १५ जानेवारी, २०२५ हा आहे. या उपक्रमांदरम्यान एनईपी - २०२० च्या महत्वाच्या पैलूंना अधोरेखित करणे आणि विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करणे यावर भर द्यावा.**

‘कॅम्पस टूर’ दरम्यान पुढील उपक्रमांचे आयोजन करता येईल : -

| अ. क्र. | उद्देश | उपक्रम |
|---|---|---|
| 1. | स्वागत सत्र | संस्थेची दृष्टी, ध्येय व कामगिरी यांची थोडक्यात ओळख. |
| 2. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० चे विहंगमावलोकन | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची उद्दिष्टे, स्वरूप, फायदे व उपयोगिता या बाबत व्याख्यान अथवा ध्वनीचित्र फीत. |
| 3. | कॅम्पस टूर | वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडासुविधा आणि अन्य पायाभूत सुविधांची मार्गदर्शित भेट. |
| 4. | परस्पर संवाद सत्र | एनईपी - २०२० विषयक शिक्षक आणि विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तर सत्र. तसेच माजी विद्यार्थी किंवा तज्ज्ञ व्यक्तींनी एनईपी अंतर्गत संधींचा उल्लेख करणारे प्रेरणादायी संवाद. |
| 5. | प्रदर्शन आणि सादरीकरण | • चालू संशोधन प्रकल्प, नवोन्मेषी विद्यार्थी उपक्रम किंवा विविध विभागांतर्गत आयोजित केल्या जाणा-या उपक्रमांचे सादरीकरण<br>• एनईपीच्या आंतरविभागीय दृष्टिकोनाशी संबंधित सांस्कृतिक किंवा कलात्मक कार्यांचे प्रदर्शन. |
| 6. | सांस्कृतिक कार्यक्रम | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्जनशील प्रतिभेचे प्रदर्शन करणारे कार्यक्रम. |
| 7. | कार्यशाळा | कौशल्यविकास, बहुविषयक शिक्षण आणि सर्वांगीण शिक्षण अशा एनईपी - २०२० शी सुसंगत विषयांवर थोडक्यात व्यावहारिक सत्रे. |
| 8. | मदत कक्ष | एनईपी - २०२०, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती आणि इतर शंका निरसनासाठी समर्पित मदत कक्ष. |

प्रत्येक महाविद्यालयाने त्यांच्या सामर्थ्यानुसार आणि उपलब्ध संसाधनांनुसार या उपक्रमांमध्ये आवश्यक ते बदल करून जरुरी नुसार भर घालावी. भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या सुरक्षिततेसाठी, सोयीसाठी व मार्गदर्शनासाठी योग्य ती व्यवस्था आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

आपण आयोजित केलेल्या उपक्रमांस दृक श्राव्य माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

आयोजित उपक्रमांचा अहवाल, छायाचित्रे व अभिप्रायांसह दिनांक २५ जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावा. (अहवालाचा नमुना सोबत जोडला आहे)

या उपक्रमाला यशस्वी बनवण्यासाठी आपल्या सक्रिय सहभागाची अपेक्षा आहे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,



[प्रा. डॉ. संजय ढोले]
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

अहवालाचा नमुना

(कृपया हा अहवाल महाविद्यालयाच्या लेटर हेड वर सादर करावा)

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० बाबत जनजागृतीसाठी‘कॅम्पस टूर’ उपक्रमाच्या आयोजनाचा अहवाल

| | |
|---|---|
| महाविद्यालयाचे नाव | |
| महाविद्यालयाचा पत्ता | |
| महाविद्यालायचा विशिष्ट ओळख क्रमांक (PUNCODE) | |
| उपक्रमाची तारीख | |
| सहभागी झालेल्या शाळांची संख्या (कृपया यादी सोबत जोडावी | |
| सहभागी झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या (कृपया यादी सोबत जोडावी | |
| एकूण सहभागी शालेय विद्यार्थी संख्या | |
| एकूण सहभागी कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या | |
| एकूण सहभागी शालेय अध्यापकांची संख्या | |
| एकूण सहभागी कनिष्ठ महाविद्यालयीन अध्यापकांची संख्या | |
| एकूण सहभागी पालकांची संख्या | |
| एकूण सहभागी साधन व्यक्तींची संख्या (कृपया यादी सोबत जोडावी) | |

आयोजित केलेले उपक्रमांची माहिती :-

| अ.क्र. | उद्देश | थोडक्यात तपशील | सहभागी व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | स्वागत सत्र | | |
| 2. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० चे विहंगमावलोकन | | |
| 3. | कॅम्पस टूर | | |
| 4. | परस्पर संवाद सत्र | | |
| 5. | प्रदर्शन आणि सादरीकरण | | |
| 6. | सांस्कृतिक कार्यक्रम | | |

| अ.क्र. | उद्देश | थोडक्यात तपशील | सहभागी व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|
| 7. | कार्यशाळा | | |
| 8. | मदत कक्ष | | |

| महाविद्यालयाचा शिक्का | स्वाक्षरी समन्वयक – १ | स्वाक्षरी समन्वयक – २ | स्वाक्षरी प्राचार्य |
|---|---|---|---|

सोबत जोडावयाची कागदपत्रे :-

| अ.क्र. | परिशिष्ट | जोडावयाचे कागदपत्र | कागदपत्र जोडले आहे / नाही |
|---|---|---|---|
| 1. | A | विहित नमुन्यातील अहवाल | |
| 2. | B | सहभागी झालेल्या शाळांची नाव व पत्त्यासह यादी | |
| 3. | C | सहभागी झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची नाव व पत्त्यासह यादी | |
| 4. | D | एकूण सहभागी शालेय विद्यार्थ्यांची शाळा निहाय यादी | |
| 5. | E | एकूण सहभागी कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची महाविद्यालय निहाय यादी | |
| 6. | F | एकूण सहभागी पालकांची संपर्क क्रमांकासह यादी | |
| 7. | G | एकूण सहभागी शालेय अध्यापकांची शाळा निहाय यादी | |
| 8. | H | एकूण सहभागी कनिष्ठ महाविद्यालयीन अध्यापकांची महाविद्यालय निहाय यादी | |
| 9. | I | सहभागी साधन व्यक्तींची यादी (नाव, पदनाम, संस्थेचे नाव व पत्ता) | |
| 10. | J | जीओटॅग असणारी किमान चार छायाचित्रे (हार्ड कॉपी) | |
| 11. | K | फीडबॅक / अभिप्राय (अध्यापक, विद्यार्थी व पालक) | |

स्कुल कनेक्ट २.० अहवाल खालील लिंकवर सोमवारनंतर अपलोड करणे.

**https://bcud.unipune.ac.in/ --> Log in using your credentials --> Navigate to the "Urgent Notification" section.--> राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अहवाल (National Education Policy 2020 Report)**

*****